# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत दाखल तक्रार क्र. रामाआ/तक्रार/२४३/२०२४/अहिल्यानगर

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| श्री.स्वप्निल ज्ञानदेव गरड,<br>मु.पो.भेंडे बु., ता.नेवासा, जि.अहिल्यानगर. | निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा,<br>ता.नेवासा, जि.अहिल्यानगर. |

### सुनावणी दिनांक-१६/०७/२०२५

तक्रारदार यांनी दि.१५/०५/२०२४ रोजीच्या अर्जान्वये, " दि.२४/०१/२०२४ रोजी मी प्रपत्र "अ" द्वारे तहसिल कार्यालयात तहसिलदार यांच्या शासकीय वाहन चे बाबतीत आवश्यक कागदपत्रांची मागणी केली, सदर अर्जाला कसलाही प्रतिसाद मिळत नसल्याने मी माहिती अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे दिनांक २३/०२/२०२४ रोजी प्रपत्र "ब" दाखल केले.

आज अखेर मला मागणी केलेल्या कागदपत्रांची नक्कल मिळालेली नाही, माहिती अधिकार अर्जाला आणि त्यावरील अपिल अर्जाला संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांनी केराची टोपली दाखवलेली आहे. सुनावणी घेण्यात आली नाही, अपिल देखील निकाली काढण्यात आले नाही.

तरी सदर प्रकरणी अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन केलेबाबत संबंधितावर योग्य ती कारवाई करण्यात यावी, ही नम्र विनंती." असे नमूद करुन कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज दाखल केला आहे.

२. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि.१६/०७/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी – तक्रारदार अनुपस्थित असून, विद्यमान आणि तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

३. तक्रारदार यांनी त्यांच्या दि.२४/०१/२०२४ रोजीच्या मूळ माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०१/०१/२०२३ ते दि.१८/०१/२०२४ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

" १) मा.तहसिलदार साहेब नेवासा यांच्या शासकीय वाहनाचे लॉग बुक झेरॉक्स साक्षांकित प्रत. २) दि.०१/०१/२०२३ ते दि.१८/०१/२०२४ या कालावधीतील तहसिलदार साहेबांचे शासकीय वाहनाने जेवढया ठिकाणी प्रवास केलेला आहे आणि ज्या कारणासाठी प्रवास केलेला आहे त्याचा तपशील साक्षांकित प्रत."

४. तक्रारदार यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा यांचेकडे दि.२३/०२/२०२४ रोजी प्रथम अपिल अर्ज सादर केलेला आहे.

५. सुनावणी दरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, अर्जदार यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयाच्या दि.२३/०२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे वस्तुस्थितीदर्शक उत्तर तक्रारदार यांना कळविले आहे. "आपण या मा.तहसिलदार नेवासा यांच्या शासकीय वाहनाचे लॉग बुक झेरॉक्स प्रती तसेच दि.०१/०१/२०२३ ते दि.१८/०१/२०२४ या कालावधीत तहसिलदार साहेबांचे शासकीय वाहनाने जेवढया ठिकाणी प्रवास केलेला आहे आणि ज्या कारणासाठी प्रवास केलेला आहे त्याच्या तपशीलाच्या छायांकित प्रती मिळणेबाबतची मागणी केलेली आहे. त्यानुषंगाने सदर माहिती आपणास विनामुल्य पुरविणेत येत आहे."

५. सुनावणी दरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तुत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२३/०२/२०२४ रोजी निर्गमित केलेल्या पत्रान्वये सदरची माहिती तक्रारदार यांना विनामुल्य पुरविल्याचे दिसून येते. तसेच, प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा, यांनी प्रथम अपिल अर्जावर कोणतीही

कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सुनावणीवेळी प्रत्यक्ष तक्रारदार अनुपस्थित असल्याने कोणती माहिती मिळाली नाही याबाबत कोणताही बोध होऊ शकला नाही.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर, यांना आदेशीत करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिलस कार्यालय, नेवासा, ता.नेवासा, जि.अहिल्यानगर, यांनी प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन, आदेश पारीत न करुन अधिनियमातील कलम १९(६) तसेच शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र. केंमाअर्ज-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६ (मा.अ) दि.१२/१२/२००७ मधील तरतुदींचे उल्लंघन केलेले असल्याची खातरजमा झाल्यास त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक सा.प्र.वि.क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ दि.३१/०३/२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

२) वरील निर्देशांसह प्रस्तूत तक्रार क्र.२४३/२०२४/अहिल्यानगर निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

प्रत- माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर, ता.जि.अहिल्यानगर, यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

जावक क्र. e३LL 12 DEC 2025